## निशाणी क्र. ०१ खालील आदेश

(भिमराव दगडू वाघमोडे वि. महाराष्ट्र सरकार )

**E FILING NO. AMH20230017939C202600016**

१. अर्जदार/फिर्यादी भिमराव दगडू वाघमोडे याने सदर अर्ज भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ५०३ अन्वये मुद्देमाल रोख रक्कम परत मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदार/फिर्यादीचे असे म्हणणे आहे की, ते मौजे जाधववाडी येथील कायमचे रहिवाशी असून त्यांच्या घरातून चोरीस गेलेला मुद्देमालापैकी रक्कम रूपये ४०,०००/- ही माळशिरस पोलिसांनी जप्त केलेली आहे. सदरची रक्कम फिर्यादीस शेतीसाठी व दवाखाना व औषधोपचारासाठी आवश्यक आहे. सदरची रक्कम पोलीस स्टेशन येथे पडून राहिलेस अर्जदाराचे आर्थिक नुकसान होणार आहे. त्यामुळे सदर रक्कम बॉण्डवर परत मिळावी अशी अर्जदाराने विनंती केली आहे.

३. तपासीअधिकारी यांनी नि.क्र. ०५ वर आपले म्हणणे दाखल करून असे कथन केले आहे की, सदरचा मुद्देमाल माळशिरस पोलिसांनी जप्त केलेला आहे. सदरचा मुद्देमाल रक्कम रूपये ४०,०००/- अर्जदाराच्या मागणीप्रमाणे योग्य त्या शर्तीवर व अटीवर परत देणेची विनंती त्यांनी केलेली आहे.

४. सरकारी वकिलांचे म्हणणे मागविण्यात आले. सरकारी वकीलांनी त्यांचे म्हणणे नि.क्र. ०६ वर दाखल करून आक्षेप नोंदविला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, जप्त मुद्देमाल हया चलनी नोटा असल्याने त्या नोटा अर्जदाराकडून चलनात वापरल्या जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदरचा मुद्देमाल अर्जदारास परत केल्यास खटल्याच्या सुनावणीवेळी सदर चलनी नोटा ओळखीसाठी उपलब्ध होऊ शकणार नाहीत.

५. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. तपासीअधिकारी यांनी त्यांच्या

म्हणणे सादर केले असून त्यात त्यांनी अर्जदाराने मागणी केलेप्रमाणे जप्त रक्कम रूपये ४०,०००/– ही तपासादरम्यान जप्त केली आहे. तसेच अर्जदाराने अभिलेखावर दाखल केलेल्या प्रथम खबरी अहवालाच्या प्रतीवरून देखील असे दिसून येते की, अर्जदाराच्या घरातून सदरची रक्कम चोरीला गेल्याने त्याने पोलीस स्टेशनमध्ये रिपोर्ट दिला, त्यावरून पोलिसांनी गु.र.क्र. ५९२/२०२५ नुसार नोंद करून तपासादरम्यान सदरचा मुद्देमाल जप्त केल्याचे दिसून येत आहे. अर्जदाराव्यतिरीक्त इतर कोणीही सदर रक्कमेची मागणी केलेली नाही. सदरची रक्कम पोलीस स्टेशन येथे पडून राहिल्यास अर्जदाराचे आर्थिक नुकसान होणार आहे. त्यामुळे अर्जदारास सदरची रक्कम योग्य त्या अटी व शर्तीवर परत करण्यास कोणतीही अडचण नाही. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणुन पुढील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. पोलीस निरीक्षक, माळशिरस पोलीस स्टेशन, ता. माळशिरस, जि. सोलापुर यांना असे निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांनी गु.र.नं. ५९२/२०२५ मध्ये जमा रक्कम रु. ४०,०००/– हे रक्कम रु. ५०,०००/– चे बंधपत्रावर अर्जदारास तात्पुरत्या स्वरुपात परत करावे.

३. संबंधीत तपासीक अंमलदारास असे निर्देशीत करण्यात येते की, त्यांनी सदर रक्कम अर्जदारास देण्यापुर्वी त्याचे छायाचित्र काढून नोटांप्रमाणे विस्तृत पंचानामा करुन तो न्यायालयात दाखल करावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by UMESH PETHE
Date: 2026.06.24 16:53:00 +0530

माळशिरस (यु. बी. पेठे)

दिनांक– २४/०६/२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, माळशिरस.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : M. P. Gheradi. |
| Name of the court | : J.M.F.C. Malshiras |
| Date of decision | : 24.06.2026 |
| Judgment uploaded on | : 24.06.2026 |